# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन
नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| अॅड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |


**: - अत्यंत महत्वाचे तातडीचे परिपत्रक - :**

**"राष्ट्रीय रोड सायकलिंग स्पर्धेसाठी पहिली निवड चाचणी स्पर्धा"**

**दिनांक:** १० ऑगष्ट २०२३

प्रती,
**मा. अध्यक्ष / मा. सचिव**
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला
संलग्न सर्व जिल्हा संघटना / क्लब / सायकलपट्टू व संबंधीत सर्व
स.न.वि.वि.

**विषय: २८व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवड करण्यासाठीच्या पहिल्या निवड चाचणी स्पर्धेबाबत....**

महोदय / महोदया,

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न असलेल्या सर्व सभासद, सायकलिंग जिल्हा संघटनांचे नोंदणीकृत सायकलपट्टू व संबंधीतांसाठी.......

**२)** सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियातर्फे सन २०२३-२४ ची **२८वी राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा विजयपूर (बिजापूर - कर्नाटक) येथे २७ ते ३० नोव्हेंबर २०२३ दरम्यान होणार आहेत.**

३) या २८व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवड करण्यासाठी **CAM** (सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र) च्या वतीने **रविवार दिनांक २७ ऑगस्ट २०२३ रोजी (टाईम ट्रायल - Time Trial) प्रकारात महाराष्ट्र राज्य स्तर खुल्या पहिल्या चाळणी निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन बारामती, जिल्हा - पुणे येथे करण्यात आले आहे.**

४) या निवडचाचणीबीबत पुढील सूचना पूर्णपणे काळजीपूर्वक वाचाव्यात आणि कार्यवाही करावी. सूचना पूर्ण वाचल्यानंतर काही शंका असल्यास श्री. प्रताप जाधव यांचेशी मोबाईलद्वारे संपर्क करावा.

५) **RIN साठी नांव नोंदणी:** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे **(CAM)** सन २०२३-२४ साठी नांव नोंदणी करुन (**RIN** - नंबर घेतलेल्या) किंवा नूतनीकरण केलेल्या सायकलपट्टूंस या निवडचाचणी स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.

५.१ ज्या सायकलपट्टूंनी अद्याप सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नोंदणी केलेली नाही किंवा नूतनीकरण केलेले नाही त्यांनी प्रथम सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाईटवरील लिंकद्वारे नोंदणी / नूतनीकरण करुन घ्यावे.



CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.

पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| अॅड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |




५.२ नोंदणी केल्यानंतर त्यांना पुढील ४८ तासात **RIN** देण्यात येईल व हा क्रमांक मिळाल्यानंतर त्यांनी चाचणीसाठी नांव नोंदणी करावी. नोंदणी अर्ज **(CAM)** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

५.३ स्पर्धेसाठी नांव नोंदणी लिंकद्वारेच (ऑनलाईन) करावी.

५.४ या स्पर्धेबाबत आणि **RIN** बाबतची सर्व माहीती व अर्ज **CAM** च्या वेबसाईटवर **Rider's Corner** या पेजवर उपलब्ध आहे.

५.५ **RIN नंबर मिळाल्यानंतर प्रत्येक सायकलपटूने नोंदणी फॉर्म व इतर सर्व फॉर्म भरुन बारामतीला घेऊन यायचे आहेत. जे सायकलपटू बारामतीला स्पर्धेसाठी येणार नसतील त्यांनी ते पुढील पत्त्यावर पाठवावेत. प्रताप जाधव, संघटन सचिव, “मातृछाया” डी-१८, अनिकेत हौसिंग सोसायटी क्र १, बिबवेवाडी रोड, पुणे ४११ ०३७.**

५.६ सायकलपटूने सीएफआय चे रायडिंग लायसेन्स काढून घेणे बंधनकारक नाही. मात्र भविष्यात ज्या सायकलपटूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होईल त्यांना सीएफआय लायसेन्स तयार करुन घेणे बंधनकारक राहील.

५.७ वयाच्या पुराव्यासाठी नोंदणी अर्ज व्यवस्थीत वाचून त्याची पूर्तता करावी.

६) **स्पर्धेसाठी नांव नोंदणीबाबत : बारामती येथे होणा-या स्पर्धेसाठी प्रवेशिका लिंकद्वारेच भरावयाची आहे. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे या स्पर्धेच्या प्रवेशीका स्वीकारण्यात येणार नाहीत.**

६.१ सायकलपटूंनी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: करावयाची आहे. निवड चाचणीमध्ये सर्व स्पर्धकांना स्वखर्चाने सहभागी व्हावे लागेल. कोणताही खर्च आयोजक / समिती उचलणार नाही.

६.३ स्पर्धा नोंदणी / खर्च फी प्रत्येकी प्रत्येक गटासाठी रुपये ५००/- राहील. पैसे सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या बँक खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीनेच जमा करावेत.

६.४ **भारतीय सायकलिंग महासंघाशी (सीएफआय) संलग्न असलेल्या सेनादल, रेल्वे क्रीडा मंडळ आदी संस्थांमधील खेळाडूंना तसेच महाराष्ट्र सोडून इतर राज्यातील सायकपटूंना**




CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

**या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. महाराष्ट्राचा अधिवास असलेल्या सायकलपट्टूंनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

६.५ प्रवेश अर्ज **मंगळवार दिनांक २२ ऑगष्ट २०२३ पर्यंत** ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

७) **स्पर्धेविषयी : रविवार, दिनांक २७ ऑगष्ट २०२३ रोजी होणारी निवड चाचणी बारामती शहरामधून भिगवनला जाताना ३ कि.मी. अंतरावर पाटस ते लिमटेक दरम्यान नवीन तयार होत असलेल्या संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर डायमेक्स कंपनी शेजारुन उजव्या हाताला वळुन लिमटेक गावाच्या दिशेचा सुमारे ७ किमी अंतारच्या मार्गावर या स्पर्धा होतील.**

७.१ स्पर्धा संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर डायमेक्स कंपनीजवळून उजव्या हाताला लिमटेक गावाच्या दिशेला वळाल्यानंतर ५०० मीटर्स पासून सुरु होईल (याबाबत गुगल लोकेशन आणि स्पर्धा मार्गाची स्ट्रावा लिंक Rider's Corner उपलब्ध आहे.

७.२ सर्व वयोगटात वैयक्तिक टाईम ट्रायल प्रकारात निवड चाचणी घेण्यात येईल व सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या सायकलपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी संभाव्य खेळाडूंची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

७.३ स्पर्धेविषयी माहिती देण्यासाठी शनिवार दिनांक २६ ऑगष्ट २०२३ रोजी सायंकाळी ५:०० वाजता सर्व सायकलपट्टूंची बैठक होईल. त्यावेळी सर्व सूचना व **BIB** क्रमांक देण्यात येतील. सर्व सायकलपट्टू, पालक, प्रशिक्षक, व्यवस्थापक यांनी या बैठकीस हजर राहणे आवश्यक आहे.

७.४ **या निवडचाचणीमधून दुस-या निवडचाचणीसाठी पात्र खेळाडूंची निवड त्यांनी दिलेल्या वेळेनुसार करण्यात येईल. सर्व वयोगटात वैयक्तिक टाईम ट्रायल प्रकारात निवड चाचणी घेण्यात येईल.**

७.५ पहिल्या चाचणी स्पर्धेत सहभागी न होता कोणत्याही कारणामुळे थेट दुस-या चाचणी स्पर्धेत भाग घेऊ इच्छीना-या सायकलपट्टूंना किंवा पहिल्या चाचणीमध्ये निवड न झालेल्या सायकलपट्टूस दुस-या निवड चाचणीमध्ये सहभागी व्हायचे असेल तर रुपये २,५००/- नोंदणी / खर्च देऊन असे सायकलपट्टू सहभागी होऊ शकतात.

८) **नियम / स्पर्धेदरम्यान पेनल्टी व ईतर :** भारतीय सायकलिंग महासंघ (CFI) आणि **CAM** (सायकलिंग असोसिएसन ऑफ महाराष्ट्र) यांच्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदलानुसार ही निवड चाचणी घेण्यात येईल.

९) **स्पर्धे ठिकाणी व रीपोर्टिंग च्या ठिकाणी निर्धारीत केलेल्या वेळी हजर राहणे ही प्रत्येक सायकलपट्टूची जबाबदारी असेल.** स्पर्धा वेळेवर आणि **RSO** नुसार पार पडेल. स्पर्धे ठिकाणी किंवा रीपोर्टिंग ठिकाणी गर्दी करु नये.

१०) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने स्पर्धक उशीरा हजर झाला तर त्यास रु. २०० दंड आकारण्यात येईल.

११) **RSO** (Rider's Start Order) शुक्रवार दिनांक २५ ऑगष्ट २०२३ रोजी दुपारी १:०० वाजता जाहीर करण्यात येईल. **FRSO** (Final Rider's Start Order) शनिवार दिनांक २६ ऑगष्ट २०२३ रोजी रात्री ७:०० वाजता जाहीर करण्यात येईल.

१२) प्रत्येक सायकलपटूची सायकल स्वत:ची असली पाहिजे. एक सायकल दोघा सायकलपट्टूंमध्ये वापरावयाची असेल तर रुपये १०० भरुन आगावू लेखी परवानगी घ्यावी लागेल. एक सायकल जास्तीत जास्त दोघां सायकलपट्टूंमध्येच वापरता येईल.

१३) एका सायकलपट्टूस एकाच वयोगटात सहभागी होता येईल. (अपवादात्मक परिस्थीतीत बदल करण्याचे अधिकार CAM ला आहेत.)

१४) कोणत्याही सायकलपट्टूस योग्य हेल्मेट शिवाय निवड चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही. प्रत्येक सायकलपट्टूचे स्वत:चे योग्य हेल्मेट आवश्यक आहे.

१५) एकाद्या सायकलपट्टूने स्पर्धेदरम्यान स्वत:च्या डोक्यामधून हेल्मेट काढल्याचे आढळल्यास किंवा हेल्मेटचा बेल्ट काढल्याचे आढळल्यास किंवा योग्य पद्धतीने हेल्मेट घातले नसल्याचे आढळल्यास त्या स्पर्धकास स्पर्धेमधून तात्काळ बाद करण्यात येईल.

१६) स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने कोणत्याही कारणाने हॅण्डेलवरील दोन्ही हाथ सोडल्याचे निर्दर्शनास आल्यास त्याक्षणी त्या स्पर्धकाचा स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.

**१७)** एकदा स्पर्धा सुरु झाल्यानंतर स्पर्धा सुरु असलेल्या मार्गावर सरावासाठी किंवा वॉर्म अप साठी कोणाही सायकलपट्टूंने जाऊ नये. वॉर्मसाठी ठरवून दिलेल्या मार्गावर व ठिकाणी वॉर्मअप वा सराव





**पत्रव्यवहाराचा पत्ता**
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

करावा. **स्पर्धा सुरु असलेल्या मार्गावर सराव करणा-या सायकलपट्टूस १ (एक) मिनीटाची पेनल्टी किंवा ५०० रुपये दंड करण्यात येईल.**

१८) या निवडचाचणीसाठी आलेल्या स्पर्धकांनी स्पर्धा मार्गा शेजारील मार्गावर (ज्यावरुन वाहतुक सुरु आहे) त्यावर सरावासाठी किंवा वॉर्म अप साठी सायकलपट्टूंनी जाऊ नये. वाहतूक सुरु असलेल्या मार्गावर सायकलपट्टू आढळून आल्यास त्याचा या स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.

१९) स्पर्धा सुरु असताना स्पर्धा मार्गाशेजारील रोडवरुन (वाहतुक सुरु असलेल्या मार्गावरुन) एकादा सायकलपट्टू कसल्याही स्वरुपाचे सहाय्य / मदत घेताना आढळल्यास अशा सायकलपट्टूस या स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

२०) स्पर्धेदरम्यान मागील सायकलपट्टूनेपुढील सायकलपट्टूस पकडल्यास दोन सायकलपट्टूंनी एकेमेकाचा पेस करु नये. पेस करताना आढळल्यास **प्रथम (पुढे) सोडलेल्या सायकलपट्टूस दोन मिनीटांची पेनल्टी देण्यात येईल किंवा स्पर्धेमधून बाद करण्यात येईल. अशा वेळी पुढील सायकलपट्टूने किमान १५ मीटर्सचे अंतर ठेवले पाहिजे.**

२१) मागून आलेल्या सायकलपट्टूने पुढील सायकलपट्टूबरोबर लिड - पेस करताना आढळल्यास दोनही सायकलपट्टूस प्रत्येकी दोन मिनीटाची पेनल्टी देण्यात येईल.

२२) स्पर्धेदरम्यान एकादा सायकलपट्टू कोणत्याही स्वयंचलीत वाहनाचा पेस करताना अढळल्यास त्यास अशा प्रत्येक प्रसंगी दोन मिनीटांची पेनल्टी देण्यात येईल अशा दोन पेनल्टीनंतर त्या स्पर्धकास पुढील सहा महिने **CAM** च्या कोणत्याही स्पर्धेत सहभागी होता योणार नाही.

२३) सायकल पंचर असेल तरच री रन (पुन्हा खेळण्याची संधी) देण्यात येईल. पंचर सायकलसह प्रथम मुख्य पंचांना रीपोर्ट करावा लागेल. मुख्य पंच पहाणी करतील व नंतर री रन साठी परवानगी देतील.

२४) मुख्य पंचांकडे री रन साठी रुपये २०० भरुन परवानगी घ्यावी लागेल. री रनची एकच संधी मिळेल.

२५) पंचर शिवाय कोणत्याही कारणाने री रन हवा असेल तर रुपये ५०० मुख्य पंचांकडे जमा करुन री रन साठी परवानगी मागता येईल. परिस्थीतीचा आढावा घेऊन मुख्य पंच री रनचा निर्णय घेतील.

**२६) स्पर्धेदरम्यान सायकलपट्टूंना मोबाईल फोन अथवा कानामधील ऐकण्याचे मशिन (ईअरींग) वापरता येणार नाहीत. असे करताना खेळाडू आढळल्यास या स्पर्धेमधील संबंधीत सायकपट्टूचा सहभाग त्याक्षणी रद्द करण्यात येईल.**


पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

२७) **नियमानुसार सर्व स्पर्धा ४० किमी अंतरापेक्षा कमी अंतराच्या आहेत. स्पर्धकाने स्वत:चे फिडींग स्वत:बरोबरच ठेवावे, बाहेरुन फिडींग वा पाणी घेऊ नये.** स्पर्धक स्वत: जवळील फिडींग वा पाणी वापरु शकतो. बाहेरुन फिडींग वा पाणी घेताना आढळल्यास ५०० रुपये दंड किवा स्पर्धेमधून निलंबन करण्यात येईल. (**अपवादात्मक परिस्थितीमध्ये पंच / पायलेट पाणी देऊ शकतात.**)

२८) कोणाही सायकलपटूने वा पालकांनी स्पर्धेतील पंच वा तांत्रिक अधिकारी वा पायलेट यांचेशी परस्पर कसल्याही स्वरुपाचा संवाद / संपर्क साधू नये. तसे आढळल्यास त्या सायकलपटूस एक मिनीटाची पेनल्टी देण्यात येईल. एकाद्या सायकलपटूच्या काही शंका असल्यास त्यासाठी मुख्य पंच किंवा संघटन सचिव श्री. प्रताप जाधव किंवा सचिव प्रा. संजय साठे यांचेशी संपर्क साधावा.

२९) पंच किंवा तांत्रिक अधिकारी किंवा पायलेट यांच्या सूचनांचे जे सायकलपटू पालन करणार नाहीत अशा सायकलपटूस १ (एक) मिनीटाची पेनल्टी किंवा ५०० रुपये दंड आकारण्यात येईल.

३०) स्पर्धा सुरु असताना स्पर्धा मार्गाशेजारील रोडवरुन (वाहतुक सुरु असलेल्या मार्गावरुन) दुचाकी वा चारचाकीमधून एकाद्या सायकलपटूचे समर्थक वा पायलेट सायकलपटूस प्रोत्साहन देताना वा सूचना देताना आढळल्यास वा कोणत्याही स्वरुपाची मदत करताना आढळल्यास अशा सायकलपटूस स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

३१) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी किंवा स्पर्धा सुरु असताना कोणीही प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक किंवा स्पर्धकाशी संबंधीत इतर कोणीही स्पर्धेस अडथळा होईल, सायकलपटूस व्यत्त्यय होईल असे कोणतेही कृत्य करु नये तसे करताना आढळल्यास त्या व्यक्तीशी संबंधीत सायकलपटूवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

३२) सर्व सायकलपटूंनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. बेशिस्त खेळाडू तसेच उद्धट खेळाडूविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रशिक्षक, व्यवस्थापक वा पालक यांच्यामुळे स्पर्धेत अडथळा आल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर स्पर्धेमधून निलंबनाची कारावाई करण्यात येईल.

३३) ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंना स्पर्धा मार्गावर सराव करावयाचा आहे त्यांनी स्वखर्चाने व स्वत:चे जबाबदारीवर करावयाचा आहे.


पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

३४) स्पर्धेठिकाणी वा स्पर्धे दरम्यान कसल्याही प्रकारची हरकत असेल तर मुख्य पंचांकडे रुपये १००० (रुपये एक हजार) भरुन लेखी स्वरुपात करावी. ३.१ परीस्थीती व गरजेनुसार निवड चाचणीच्या वेळापत्रकात बदलü होऊ शकतो जो सर्वांवर बंधनकारक राहील.

३५) एक मिनीटाच्या तीन पेनल्टी मिळालेल्या सायकलपट्टूस या स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

३६) **महत्वाचे:** आयत्यावेळी उदभवलेल्या कोणत्याही कारणाने स्पर्धा कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र वा संयोजकांस आहेत. हे सर्व बदल सहभागी सर्वांवर बंधनकारक असतील.

३७) स्पर्धा संपल्यानंतर लगेचच या स्पर्धेचा निकाल जाहिर करण्यात येईल. सविस्तर निकाल दुस-या दिवशी वेबसाईटवर जाहिर करण्यात येईल.

आपल्या जिल्ह्यामधील ईच्छूक सर्व सायकलपटूंना या निवड चाचणीच्या नियमांपासून अवगत करावे व सहकार्य कारवे.

कळावे, धन्यवाद !!

आपले विनीत

| प्राताप जाधव | प्रा. सजय साठ |
|---|---|
| संघटन सचिव | मानद सचिव |

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

१) ॲड. विक्रम रोठे .... अध्यक्ष, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

२) मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे

३) मा. प्राचार्य, पुणे क्रीडा प्रबोधिनी, पुणे

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM Cycling Association Of Maharashtra

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| अॅड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |


## दिनांक २७ ऑगष्ट २०२३ रोजी होणा-या पहिल्या राज्यस्तरीय खुल्या निवडचाचणी स्पर्धेसाठी वयोगट व अंतर.

Age group and distance for the First State Level Open Selection Trials

| अ.क्र. SI No | वयोगट Age Group | एकूण अंतर Total Distance | लॅप्स् Laps | पात्र जन्मसाल Eligible birth year |
|---|---|---|---|---|
| १ 1 | **EM : Elite Men & EW : Elite Women** १९ वर्ष आणि त्याअगोदर जन्मलेले महिला आणि पुरुष | पुरुषांसाठी :४२ कि. मी. For Men : 42 Kms | १४ किमी चे ३ लॅपस्. 3 Laps of 14 Km each. | १९ वर्ष व त्यावरील पुरुष व महिला. (सन २००४ आणि त्याअगोदर जन्मलेले) **Men & Women 19 years and above (Born 2004 and earlier)** |
| | **Men and Women born 19 Years and earlier.** | महिलांसाठी : २८ कि. मी. For Women : 28 Km | १४ किमी चे २ लॅपस्. 2 Laps of 14 Km each. | |
| २ 2 | **MU 23: Men U/23** २३ वर्षाखालील पुरुष. **Men Under 23 yrs.** | पुरुषांसाठी :४२ कि. मी. For Men : 42 Kms | १४ किमी चे ३ लॅपस्. ३ Laps of 14 Km each. | २००१, २००२, २००३ व २००४ या वर्षामध्ये जन्मलेले केवळ पुरुषांसाठी. **Men Born in 2001, 2002, 2003 and 2004.** |
| ३ 3 | **MJ : Men Junior.** वय वर्ष १७ आणि १८. **Aged 17 and 18 years.** | मुलांसाठी : २८ कि. मी. For Boys : 28 Kms | १४ किमी चे २ लॅपस्. 2 Laps of 14 Km each. | २००५ आणि २००६ या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली. **Boys & Girls Born in 2005 and 2006.** |
| | **WJ : Women Junior.** वय वर्ष १७ आणि १८. **Aged 17 and 18 years** | मुलींसाठी : २० कि. मी. For Girls : 20 Kms | १0 किमी चे 2२लॅपस्. 2 Laps of 10 Km each. | |
| ४ 4 | **Sub Juniors Boys and Girls.** वय वर्ष १५ आणि १६. | मुलांसाठी : २० कि. मी. For Boys : 20 Kms | १० किमी चा १ लॅप. 1 Lap of 10 Km. | २००७ आणि २००८ या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली. **Boys & Girls Born in 2007 and 2008.** |
| | **Aged 15 and 16 years.** | मुलींसाठी : १४ कि. मी. For Girls : 14 Kms | १४ किमी चा १ लॅप. 1 Lap of 14 Km. | |
| ५ 5 | **Youth Boys and Girls.** वय वर्ष १२, १३ आणि १४. | मुलांसाठी : १४ कि. मी. For Boys : 14 Kms | १४ किमी चा १ लॅप. 1 Lap of 14 Km. | २००९, २०१० आणि २०११ या वर्षात जन्मलेली मुले आणि मुली. **Boys & Girls Born in 2009, 2010 and 2011.** |
| | **Aged 12, 13 and 14 years.** | मुलींसाठी : १० कि. मी. For Girls: 10 Kms | १० किमी चा १ लॅप. 1 Lap of 10 Km. | |



CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.


**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com


KREEDA JAGRUTI

- **महत्त्वाचे:** या निवड चाचणीबाबत राज्य शासन, जिल्हा प्रशासन, स्थानिक प्रशासन किंवा पोलीस प्रशासन यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे या निवडचाचणीमध्ये सहभागी होणा-या प्रत्येकाला बंधनकारक असेल. तसेच, वेळोवेळी उद्‌भवणाऱ्या कोणत्याही महत्वाच्या कारणामुळे, वरील वेळापत्रकात बदल संबंधितांनी सुचविल्यास, ते या निवड चाचणीतील सर्व सहभागींना बंधनकारक असतील.

- **Important:** Everyone will be bound to follow all the instructions given by the State Government, District Administration, Local Administration or Police Administration regarding this selection trials. Also, if due to any important reason arising from time to time, changes in the above schedule are suggested by the concerned authority, it will be binding on all the participants of this selection trials.

| | |
|---|---|
| **प्रताप जाधव** | **प्रा. संजय साठे** |
| संघटन सचिव | मानद सचिव |